पान १ वरून

कॉर्पोरेट जिहादला लगाम

उदाहरणे देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. सभागृहात हा विषय मांडताना चित्रा वाघ म्हणाल्या, आतापर्यंत आपण गरीब, अडाणी किंवा ग्रामीण भागातील लोकांना पैशांचे आमिष दाखवून धर्मांतर केल्याचे प्रकार पाहिले आहेत. परंतु थेट वातानुकूलित (एसी) कार्यालयात काम करणाऱ्या, उच्चशिक्षित आणि सक्षम महिलांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जात आहे. 'धर्म बदला, इस्लाम स्वीकारा, नाहीतर तुमचे करिअर संपवून टाकू, नोकरीवरून काढून टाकू' अशा धमक्या देऊन तरुणींवर प्रचंड मानसिक दबाव आणला जात आहे आणि त्यांचे लैंगिक शोषण केले जात आहे. पॉश (लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा) सारखा कडक कायदा अस्तित्वात असतानाही कंपन्यांचे वरिष्ठ व्यवस्थापन अशा नराधमांना पाठीशी घालत असल्याचा आरोप त्यांनी केला. अंतर्गत तक्रार निवारण समित्यांचे (आयसीसी) नियम केवळ कागदावरच राहिले आहेत. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी अंतर्गत तक्रार निवारण समित्यांच्या अहवालाची वाट न पाहता स्वदखल घ्यावी, गुन्हेगारांचे चारित्र्य प्रमाणपत्र कायमचे रद्द करून त्यांना ब्लॅकलिस्ट करावे आणि पीडित मुलींच्या सुरक्षेसाठी २४/७ गोपनीय ऑनलाईन पोर्टल व विशेष हेल्पलाईन सुरू करावी, अशी आग्रही मागणी वाघ यांनी केली.

व्यवस्थापनाची कुचराई खपवून घेणार नाही

सहभाग नसून त्यांनी तपासात पूर्ण सहकार्य केले आहे आणि शासन सुचवेल त्या सर्व सुधारणा लागू करण्याची तयारी दर्शवली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. सध्याचे कायदे हे खासगी कार्यालये आणि आयटी क्षेत्रात रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या वाढत्या संख्येनुसार अपुरे पडत आहेत, अशी कबुली मुख्यमंत्र्यांनी दिली. यासाठीच दोन्ही सभागृहांच्या महिला आमदारांची विशेष समिती या नवीन प्रकारच्या गुन्हेगारीचा आणि घटनांचा सखोल अभ्यास करेल. ही समिती कायदेशीर त्रुटी शोधून तरतुदी सुचवेल, ज्यांची राज्य सरकार तातडीने कायद्यात रूपांतर करून अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सिंधुदुर्गमध्ये 'मालवणी भाषा भवन' उभारणार

केलेल्या उपाययोजनांची माहिती देताना मंत्री सामंत यांनी सांगितले की, लंडनमधील 'महाराष्ट्र मंडळा'च्या इमारतीची मालकी आता महाराष्ट्र शासनाने घेतली आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने 'मराठी भाषा वैश्विक केंद्र' सुरू केले जाणार आहे. तसेच दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारला जाणार असून, तिथे कवी कुसुमाग्रजांच्या नावाने 'मराठी अध्यासन केंद्र' सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात शिवरायांच्या 'गनिमी काव्यावर' आधारित विशेष अभ्यासक्रमही शिकवला जाणार आहे. मंत्रालयातील आणि प्रशासनातील मराठीच्या वापराबाबत बोलताना उदय सामंत यांनी एक मोठा निर्णय जाहीर केला. १९५६ सालच्या एका जुन्या परिपत्रकाच्या आधारे शासकीय अधिकाऱ्यांसाठी हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करण्यात आली होती. हा अनेक दशकांचा जुना नियम आणि ते परिपत्रक मराठी भाषा विभागाने रद्द केले असल्याची घोषणा त्यांनी सभागृहात केली. राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, दुकाने येथील मराठी पाट्या आणि सूचनाफलकांच्या कडक अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची विशेष बैठक घेतली जाईल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र कार्यालयासह 'मराठी भाषा अधिकारी' नियुक्त केले जातील.जागतिक स्तरावरील आंतरराष्ट्रीय मंचांची संख्या ३९ वरून ७५, तर देशांतर्गत मंचांची संख्या ७५ पर्यंत वाढवली जाईल. एका वर्षात ७५ मातृभाषा मंच तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल. पुढील तीन महिन्यांत मराठीच्या विकासासाठी सर्व समित्या गठित केल्या जातील. विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्य मराठीत आणण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल साहित्यिकांना मदत करण्यासाठी ही समिती काम करेल, अशी माहिती सामंत यांनी दिली.

आशियातील सर्वोत्तम 'मातृभाषा भवन' मुंबईत उभारणार

काम वेगाने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. सर्वसामान्य नागरिकांना आणि विशेषतः रिक्षाचालकांना मराठी शिकण्यासाठी लवकरच एक मोबाईल ॲप विकसित केले जाणार असून, यासाठी परिवहन विभागाचे सहकार्य लाभत आहे. मराठी भाषेच्या धोरणासाठी पुढील १५ दिवसांत सर्वपक्षीय आमदारांची एक समिती स्थापन केली जाईल आणि त्यात सुधीर मुनगंटीवार यांचा सक्रिय सहभाग असेल, अशी ग्वाही मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली.

लोकलमध्ये दरवाजा बंद करण्याच्या वादातून तरुणाची हत्या

१४ तासांत आरोपीला कुर्ला येथून अटक केली आहे. मृत तरुण मयंक लोहार (२२) हा अंधेरी पश्चिम येथील एका स्टोअरमध्ये सेल्समन म्हणून कार्यरत होता. मंगळवारी रात्री तो आपले काम संपवून चर्चगेट-नालासोपारा फास्ट लोकलने (ट्रेन क्र. ९०६६३) आपल्या घरी परतत होता. मुसळधार पावसामुळे लोकलच्या डब्यात शिरणारे पाणी रोखण्यासाठी मयंकने सहप्रवाशाला दरवाजा बंद करण्याची विनंती केली. यावरून दोघांमध्ये बाचाबाची होऊन वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. गोरेगाव आणि मालाड स्थानकादरम्यान आरोपीने आपल्या बॅगेतून धारदार चाकू काढून मयंकच्या पोट व छातीवर तीन ते चार वार केले. या हल्ल्यामुळे डब्यात एकच खळबळ उडाली आणि प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. रात्री ११.०४ वाजता ट्रेन बोरिवली स्थानकावर येताच आरोपीने प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर चालत्या ट्रेनमधून उडी मारून पळ काढला. या घटनेमुळे मुंबई लोकलच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच जीआरपी आणि आरपीएफची पथके तत्काळ डब्यात पोहोचली. गंभीर जखमी मयंकला रात्री ११.२२ च्या सुमारास बोरिवली स्थानकावरील आपत्कालीन वैद्यकीय कक्षात नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्याला कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारादरम्यान दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला. बोरिवली शासकीय रेल्वे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला. काळा शर्ट आणि काळी पॅन्ट घातलेल्या संशयित आरोपीची ओळख पटवण्यात आली. तपासाअंती, रोशन सुवर्ण (३०) या आरोपीला पोलिसांनी बुधवारी कुर्ला परिसरातून अटक केली. आरोपीकडे चाकू कसा आला आणि नेमका हेतू काय होता, याचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

सोन्याच्या दरात १० वर्षांतील मोठी घसरण

२०१६ नंतरची सर्वात मोठी तिमाही घसरण ठरणार आहे. सोन्याने प्रति औंस ५,४१७ डॉलरचा सर्वकालीन उच्चांक गाठला होता, त्यानंतर आता त्यात सुमारे २४ टक्क्यांची घसरण झाली आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत सोन्याची ही कामगिरी अत्यंत सुस्त राहिली आहे. चांदीच्या दरात १७.६ टक्क्यांची घसरण नोंदवण्यात आली असून, जून २०२२ नंतरची ही सर्वात मोठी घसरण आहे.

खा. नारायण राणे आज रत्नागिरी दौऱ्यावर

दुपारी ३ वाजता भाट्ये येथील कृषी विभागाच्या नर्सरीमध्ये शासनाच्या 'मागेल त्याला काजू' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना काजू कलमांचे वाटप करण्यात येणार असून या कार्यक्रमाला ते प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता भाट्ये येथील डॉ . बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत नारळ संशोधन केंद्राला सदिच्छा भेट देणार आहेत. खा. नारायण राणे यांच्या या दौऱ्यामुळे शासकीय, कृषी, सामाजिक आणि पक्षीय कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून विविध कार्यक्रमांद्वारे नागरिकांशी ते संवाद साधणार आहेत

भारतात डॉ.बाबासाहेबांचे संविधानच चालेल, 'शरिया कानून'नाही!

छायाचित्र प्रदर्शित करण्यात आल्याचेही समोर आले आहे. त्यानंतर सकल हिंदू समाजाच्यावतीने परतूरमध्ये जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. याबाबत मंत्री राणे यांनी विधानभवनाच्या आवारात माध्यमांशी संवाद साधला. महायुती सरकार या मोर्चातील हिंदू समाजाच्या प्रत्येक मागणीची निश्चित दखल घेईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला. ना. नितेश राणे म्हणाले, काल सभागृहात विरोधकांनी जी पाकिस्तानची तळी उचलून धरली होती, त्याचेच घाणेरडे चित्र परतूरच्या शाळेत पाहायला मिळाले. लहान मुलांसमोर पाकिस्तानशी निगडित गाणी आणि 'सर तन से जुदा'चे नारे वाजवून जिहाद कसा असतो, हे दाखवण्याचा नीच प्रयत्न केला गेला. आमचे पोलीस खाते या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे. परंतु, ही जिहादी मानसिकता आमच्या या महाराष्ट्रात आणि हिंदू राष्ट्रात मुळीच खपवून घेतली जाणार नाही. पाकिस्तानच्या विचारांचे जे कोणी हिरवे साप आमच्या महाराष्ट्रात दडून बसले असतील, त्यांना शोधून ठेचण्याचे काम आमचे हिंदुत्ववादी महायुती सरकार करेल. आपल्याच देशात राहून शरिया कायद्याची भाषा करणाऱ्या संघटना तत्काळ बरखास्त (स्क्रॅप) करून त्यांच्यावर बंदी आणली पाहिजे. अशा बोर्डाच्या सर्व सदस्यांना अटक करून तुरुंगात डांबले पाहिजे", असेही नितेश राणे म्हणाले.

समाजकंटकांसाठी आमचे 'स्पेशल डोस'

लागते; वेळ आल्यावर आम्ही ते निश्चित देऊ, असा इशारा मंत्री नितेश राणे यांनी दिला.

आ. निलेश राणे यांच्या माध्यमातून घरकूल लाभार्थ्यांना दिलासा

राणे यांनी घरकूल लाभार्थ्यांचे प्रश्न पावसाळी अधिवेशनात उपस्थित करून लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने महत्वाची भूमिका बजावली आहे. मालवण कुडाळ मतदार संघात ३ हजार ५०० मंजूर घरकुल कामे रखडली असून लाभार्थी यांची ८ कोटी ५० लाख रूपयांची बिल रखडली. बजेटमध्ये तरतूद झाली असल्याने लवकरच रखडलेली बिल मिळावीत. यासोबत वन आरक्षण क्षेत्रातील घरकुलांसाठी जागेची समस्या मोठी आहे. मतदार संघातील पुळास गावात घरकूल योजनेत लाभार्थी नावे आहेत मात्र वन विभाग परवानगी देत नसल्याने घरकूल मान्यता नाही. याबाबत लवकर एनओसी मिळावी. सोबतच बांधकामासाठी वाळू उपलब्धता हा प्रश्न आहे. वाळू धोरणच नसल्यामुळे महसूल अधिकारी वाळू गाडी पकडून कारवाई सुरु असताना वाळू सुलभ मिळावी यावर निर्णय व्हावा. या जनहिताच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आमदार निलेश राणे यांनी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला. त्यावर सकारात्मक चर्चेअंती घरकूल लाभार्थी यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आश्वासने मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहेत.

कोकणातील कृषी व सिंचन समस्यांवर आ.शेखर निकम यांची सभागृहात प्रभावी मांडणी

डोंगराळ भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन कोकणासाठी स्वतंत्र सिंचन निकष लागू करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. बांबू लागवड आणि बांबू उद्योगाला चालना देण्यासाठी कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून दर्जेदार रोपनिर्मिती करण्याचे धोरण राबवावे, अशी सूचना त्यांनी केली. तसेच खतांचा पुरवठा वेळेत उपलब्ध व्हावा यासाठी शासनाने नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे राज्यातील प्रमुख काजू उत्पादक जिल्हे असूनही काजू संशोधन व प्रक्रिया केंद्रे इतरत्र जात असल्याची खंत व्यक्त करत काजू बाजार समिती, निर्यात केंद्र, प्रक्रिया क्लस्टर व मूल्यवर्धन उद्योग कोकणातच उभारण्याची मागणी त्यांनी केली. आंबा, काजू, फणस, करवंद, जांभूळ यांसारख्या कोकणातील उत्पादनांसाठी स्वतंत्र ब्रँडिंग व निर्यात प्रोत्साहन धोरण जाहीर करण्याची गरज त्यांनी मांडली. स्वर्गीय भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत सुपारी पिकाचा समावेश करण्याची मागणी करत कोकणातील सुपारी उत्पादकांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी नमूद केले. महाडीबीटी योजनांमधील लाभार्थी निवड प्रक्रिया अधिक वेगवान करून शेतकऱ्यांना वेळेत मंजुरी मिळावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच बचत गटांच्या माध्यमातून बांबू, आंबा, काजू, जांभूळ आदी पिकांच्या रोपवाटिका उभारण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्याची आवश्यकता व्यक्त केली. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासाठी मंजूर झालेल्या निधीबद्दल शासनाचे आभार व्यक्त करत शैक्षणिक इमारती, वसतिगृहे, पदव्युत्तर शिक्षणाची क्षमता वाढ आणि आवश्यक मनुष्यबळ मंजुरीबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कोकणातील प्रमुख भात पिकासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संशोधन आणि उत्पादन वाढीसाठी विशेष योजना राबविण्याची मागणीही त्यांनी केली. नियम २९३ अंतर्गत झालेल्या या चर्चेत आ. शेखर निकम यांनी कोकणातील शेतकरी, फलोत्पादक, कृषी प्रक्रिया उद्योग, सिंचन आणि कृषी शिक्षणाशी संबंधित अनेक प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देत कोकणच्या सर्वांगीण कृषी विकासासाठी ठोस उपाययोजनांची मागणी केली.

गवारेड्यांकडून खैर रोपवाटिकेची नासधूस

तालुक्यातील काही गावांमध्ये गवा रेड्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. कळपाने फिरणाऱ्या या गवा रेड्यांनी शेतकऱ्यांच्या बाग बागायती, फळबागायतींना लक्ष्य करत त्यांची नासधूस करण्यास सुरुवात केली आहे. गव्यांचे कळप काजू, आंबा तसेच इतर फळबागांमध्ये घुसून झाडांना अंग घासत असल्याने झाडांचे नुकसान होत आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असून वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवाबाबत शेतकऱ्यांमधून चिंता व्यक्त केली जात आहे. अशाच प्रकारे तालुक्यातील झापडे येथील शेतकरी मधुकर गोविंद पालये यांच्या शेतातील खैर रोपवाटिकेची गव्यांनी नासधूस केली. या घटनेत हजारो खैर रोपे उद्ध्वस्त झाली आहेत. खैर रोपांना सध्या मोठी मागणी असताना झालेल्या या नुकसानीमुळे रोपांचा तुटवडा निर्माण झाला असून पालये यांना सुमारे दोन लाखांपेक्षा अधिक आर्थिक नुकसान झाले आहे.

केतनच्या हत्येचा कट लोहगडावरच रचला

होता.सिया गोयल आणि तिचा साथीदार चेतन चौधरी हे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने संपर्कात होते. या काळात त्यांनी एकमेकांशी २ हजारांहून अधिक वेळा फोनवरून संवाद साधला होता, ज्यातून ते हत्येचा कट रचत होते. गुन्हा करण्यापूर्वी सिया आणि चेतन एका कॅफेमध्ये भेटले होते. या भेटीदरम्यान त्यांनी केतनला किल्ल्यावरून नेमक्या कोणत्या ठिकाणावरून खाली ढकलणे सोपे जाईल, याची चर्चा केली होती.

खामेनी यांच्या अंत्यसंस्कारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना निमंत्रण

दिली. मात्र, भारताने या निमंत्रणाचा अद्याप स्वीकार केलेला नाही. अयातुल्ला अली खामेनी (वय ८६) यांचे २८ फेब्रुवारी रोजी तेहरानवर झालेल्या इस्रायल-अमेरिका हवाई हल्ल्यात निधन झाले होते. इराण युद्धाच्या परिस्थितीत असल्याने त्यांच्यावर यापूर्वी अंत्यसंस्कार होऊ शकले नव्हते. आता ४ व ५ जुलैपासून त्यांच्या अंत्यविधीची प्रक्रिया सुरू होणार आहे. ४ व ५ जुलैला तेहरानमधील ग्रँड इमाम खोमेनी मोसाल्ला येथे निरोप समारंभ होईल. ६ जुलै रोजी तेहरानमध्ये मुख्य अंत्ययात्रा होईल. यामध्ये अयातुल्ला खामेनी यांच्यासह इतर चार हुतात्म्यांच्या पार्थिवांचीही अंत्ययात्रा काढली जाईल. ७ जुलैला पवित्र शहर 'कोम' येथे विशेष प्रार्थना आणि विधी होतील. ८ जुलैला अंत्ययात्रा इराकमधील नजफ आणि कर्बला शहरांत नेली जाईल. ९ जुलै रोजी मशहाद येथील इमाम रझा श्राइन येथे त्यांच्यावर अंतिम अंत्यसंस्कार केले जातील.

मुंबईत ३०० मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद

विभागात ३२२ मिमी, मालवणीत ३३४ मिमी, पवईत २९६ मिमी, मालाडमध्ये २८९ मिमी, तर दादरमध्ये २७७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. दक्षिण मुंबईने गेल्या एका दशकातील सर्वाधिक पावसाचा विक्रम नोंदवला असून, २४ तासांत येथे २४८ मिमी पाऊस पडला आहे.

मुंबई गोवा महामार्गावर भोस्ते घाटात भरधाव कंटेनर पलटी

महामार्गावरील डिव्हायडर ओलांडून महामार्गाच्या विरुद्ध बाजूला गेला. त्यानंतर पुन्हा मुंबईच्या दिशेच्या मार्गावर येत कंटेनर रस्त्यावरच पलटी झाला. अपघात इतका भीषण होता की कंटेनर काही अंतर महामार्गावर घासत गेला. तसेच महामार्गालगतचे लोखंडी संरक्षक रेलिंगही या अपघातात नुकसानग्रस्त झाले. कंटेनर दरीच्या दिशेने घसरत असतानाच तो थांबल्याने मोठी दुर्घटना टळली. अपघाताची माहिती मिळताच मदत ग्रुप खेडचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद गांधी आणि अभिषेक डेरवणकर यांनी रुग्णवाहिकेसह तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी चालकाला प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारांसाठी एसएमएस रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच कशेडी महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत करण्यासाठी तत्काळ उपाययोजना केल्या. या अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

गणपतीपुळेतील दुर्घटनेनंतरही पर्यटकांची सुरक्षा वाऱ्यावरच

करणारी यंत्रणा आवश्यक आहे.

२००६ चा शासन निर्णय नेमका कुठे अडकला?

८ सप्टेंबर २००६ रोजी राज्य शासनाने समुद्रकिनाऱ्यांवरील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सविस्तर नियमावली मंजूर केली होती. त्यामध्ये जीवनरक्षक, संरक्षक जाळी, जीवरक्षक ट्यूब्स, लाइफ जॅकेट्स, सर्चलाईट, गस्ती वाहने, मार्गदर्शक, धोक्याची सूचना देणारी सायरन व्यवस्था, प्रथमोपचार केंद्र, रुग्णवाहिका, टेहळणी मनोरे आणि फ्लडलाइट्स यांसारख्या सुविधा अनिवार्य करण्यात आल्या होत्या.याचबरोबर ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि पर्यटन विभागाने या उपाययोजनांची अंमलबजावणी करून त्रैमासिक अहवाल शासनाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले होते.मात्र आज प्रश्न उपस्थित होतो की, कोकणातील सर्व प्रमुख समुद्रकिनाऱ्यांवर या सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध आहेत का? त्रैमासिक अहवाल नियमितपणे संबंधित विभागांकडे पाठवले जातात का? आणि त्यांचे परीक्षण कोण करते?

रत्नागिरीत रोबोटिक बचाव यंत्रणा का नाही?

रायगड जिल्ह्यातील काशिद समुद्रकिनाऱ्यावर काही वर्षांपूर्वी बुडणाऱ्या पर्यटकाचा जीव रोबोटिक वॉटरक्राफ्टच्या मदतीने वाचविण्यात आला होता. अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर रत्नागिरी जिल्ह्यातील प्रमुख समुद्रकिनाऱ्यांवर का केला जात नाही, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.गणपतीपुळे, आरे-वारे आणि इतर गर्दीच्या समुद्रकिनाऱ्यांवर अत्याधुनिक बचाव नौका, ड्रोन निगराणी, रोबोटिक वॉटरक्राफ्ट, प्रशिक्षित लाइफगार्ड, नियंत्रण कक्ष आणि तातडीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे.

गणपतीपुळे दुर्घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की, समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न आता केवळ चर्चेचा विषय राहिलेला नाही. तो थेट मानवी जीवाशी संबंधित आहे. संबंधित विभागांनी या दुर्घटनांची गंभीर दखल घेऊन जबाबदारी निश्चित करावी, विद्यमान यंत्रणेचे लेखापरीक्षण करावे आणि तातडीने प्रभावी उपाययोजना राबवाव्यात.अन्यथा प्रत्येक दुर्घटनेनंतर शोक व्यक्त करणे, चौकशीची घोषणा करणे आणि काही दिवसांनी सर्व काही विसरून जाणे, हा क्रम सुरूच राहील. आणि दुर्दैवाने पुन्हा एखाद्या समुद्रकिनाऱ्यावर निरपराध पर्यटकाचा जीव जाईल.प्रश्न फक्त इतकाच आहे की प्रशासन अजून किती बळींची वाट पाहतेय?

पर्यटन विकासाच्या घोषणा आणि वास्तवातील तफावत

महोत्सव, जाहिराती आणि प्रचार मोहिमा पुरेशा नाहीत. प्रत्येक प्रमुख समुद्रकिनाऱ्यावर २४ तास सज्ज असलेली आपत्कालीन बचाव यंत्रणा उभी राहिली पाहिजे.

शुद्धीपत्रक

दि. २४ जून रोजी प्रसिद्ध झालेल्या दै. प्रहारच्या रत्नागिरी आवृत्तीमध्ये पान ५वर ॲड. विद्याभुषण व्ही. वैद्य यांची नोटीस प्रसिद्ध झाली आहे. जमिन मिळकतीचे विद्यमान मालक उज्वला दयानंद पोटे यांची जमिन मिळकतीसंदर्भात जाहीर नोटीस आहे. या जाहिरातीमध्ये मालमत्ता क्र. WS22001875 असा नजरचुकीने प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. मात्र, सदर मालमत्ता क्र. W5Z2001875 असे वाचण्यात यावे.

ॲड. विद्याभुषण व्ही. वैद्य
नोटरी भारत सरकार
मु.पो.ता. दापोली, जि. रत्नागिरी
मोबा.: ८८८८६४६४६४, ९४२२३९३११८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस प्रस्तुत जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, मौजे देवघर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी, येथील गट नं. ३७७ ही मिळकत आमचे अशील सौ. रुपाली समीर सावंत यांनी तारीख ०४/०३/२०२२ रोजीच्या रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घेतलेली आहे. सदरहू मिळकतीचे पूवीर्चे मालक सिताराम गंगाराम सकपाळ व श्री. दत्ताराम धाकू घाणेकर वगैरे यांचे दरम्यान ता. २३/०३/२०१५ रोजी दस्त क्र. ३१४/२०१५ या शिर्षकाखाली खरेदीखत नोंदविण्यात आलेले होते. सदरहू खरेदीखत हे आमचे अशिलांचे पती श्री. समीर विठ्ठल सावंत हे मौजे कात्रोळी ते चिपळूण असा प्रवास करीत असताना गहाळ झालेले आहे. तरी सदरहू खरेदीखत हे कोणास आढळून आल्यास अथवा सापडल्यास आजपासून पुढील सात दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर आणून द्यावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे

सही/-
ॲड समीर रामदास मोरे
पत्ता :- दिवाणी न्यायालय चिपळूण शेजारी, मुंबई-गोवा हायवे, चिपळूण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी,
मोबा.: ९०४९४७१८१३
शिक्का

चिपळूण येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे न्यायालयात, मुक्काम-चिपळूण

जाहीर नोटीस

अर्जदारतर्फे वकील- श्री. एम. एल. साठे
दिवाणी किर.अर्ज क्र. ६७/२०२६
नेमली ता. ०३/०८/२०२६ निशाणी क्र. ७
CNR- MHRT070007422026

श्रीमती सुरेखा अनंत भोसले, उ.व.७०, धंदा- गृहिणी
रा. घर नंबर १७३ अ. मिरजोळी, भोरजेवाडी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी - अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही - सामनेवाले

अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग (VIII) कलम २ प्रमाणे संहिता ऑर्डर १६ नियम १० प्रमाणे

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा कै. सुधीर अनंत भोसले यांचे दि. २४/०४/२०२६ रोजी घर नं. १७३ अ. मिरजोळी, भोरजेवाडी, ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथे मयत झाले आहेत. मयत कै. सुधीर अनंत भोसले हे घर नं. १७३ अ. मिरजोळी, भोरजेवाडी, ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथील कायमचे रहिवासी होते. मयत कै. सुधीर अनंत भोसले यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना त्यांच्या सरकारी व खाजगी कामकाजाकरीता अर्जदार हे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. मयत कै. सुधीर अनंत भोसले यांना अर्जदार यांचे व्यतिरक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, प्रस्तुत कामी अर्जदार यांना तसा वारस दाखला मिळणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी वरील कोर्टात दि. ०३/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अथवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा अर्जदार यांना तसा वारस दाखला मिळणेस कोणाची काही हरकत नसल्याचे मानून अर्जाचे चौकशीचे काम पूर्ण करणेत येवून अर्जदार यांना तसे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख २३ माहे जून सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.
तयार करणार

सही/-
(श्री. व्ही. एम. सोवनी)
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, चिपळूण

शिक्का

सही/-
(सौ. एम. एम. आठल्ये)
प्र. सहा. अधिक्षक (आस्था)
दिवाणी न्यायालय, क.स्तर, चिपळूण

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी चिपळूण यांचे कार्यालय

कुळवहिवाट दावा क्र. १८/२०२५
e-qjcourts no- 2025/00036

जाहीर नोटीस

१) श्री. जनार्दन हरी अपंगे
रा. मु. पो. कुटरे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - अर्जदार

विरुद्ध

१) श्री. नथुराम बाळकृष्ण टाकळे, २) श्री. संजय बाळकृष्ण टाकळे, ३) श्री. संतोष मारुती टाकळे, ४) शुभलक्ष्मी सदानंद देवळेकर, ५) श्री. शारदा शरद चिंगळे, ६) गीता नथुराम लकेश्री, ७) माया देवी खातू, ८) जयश्री बाळकृष्ण टाकळे, १०) नीता नंदकुमार टाकळे ११) श्री. नितीन नंदकुमार टाळे १२) नेहा सचिन सुर्वे १३) कादंबरी कौस्तुभ कान्हेरे १४) पूजा संतोष जाधव १५) सुमेधा सुभाष पाष्टे १६) अर्चना अशोक चोचे १७) श्री. उदय दत्ताराम टाकळे १८) श्री. विश्वास नागेश टाकळे १९) श्री. भिकाजी नागेश टाकळे २०) श्री. नवनाथ नागेश टाकळे २१) श्री. प्रकाश नागेश टाकळे २२) श्री. संदेश दिलीप टाकळे २३) सौ. दिप्ती दिलीप टाकळे २४) श्री. तृप्ती दिलीप टाकळे २५) श्री. प्राची दिलीप टाकळे २६) श्री. विजय नागेश टाकळे
वरील सव्वीस रा. मु. पो. कुटरे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - सामनेवाले

मुंबई कुळवहिवाट शेत जमीन अधिनियम १९४८ चे कलम ७०(ब) सुधारीत कलम ४(२) प्रमाणे

अर्जदार व सामनेवाले यांस कळविण्यात येते की, खालील निर्दिष्ट केलेल्या जमिनीबद्दल अर्जदार यांनी कुळकायदा ७० ब खाली केलेल्या अर्जाची सुनावणी कार्यालयाकडे चालु आहे. सामनेवाले क्र. ४ व ६ हे मयत असून अर्जदार यांस सामनेवाले क्र ४ व ६ यांचे वारसांचे पत्ते आढळत नसल्याने सबब सामनेवाले क्र ४ व ६ यांस तसेच त्यांच्या कायदेशीर वारसांना व सर्व सामनेवाले यांना कायदेशीर नोटीस बजावणी करीता प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरचे प्रकरणाची सुनावणीची तारीख ०७/०७/२०२६ अशी नेमण्यात आलेली आहे. सबब, वर नमूद सामनेवाले स्वत: किंवा त्यांचे वालीवारसांनी स्वत: अगर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी मार्फत नेमलेल्या तारखेस उपस्थित राहुन सदर कुळवहीवाट दावा प्रकरणी त्यांचे लेखी म्हणणे मांडावयाचे असल्यास किंवा हरकत घ्यावयाची असल्यास दि. ०७/०७/२०२६ रोजी दुपारी १२ वाजता तहसिलदार चिपळूण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी यांचे न्यायालयात आपण स्वत: किंवा आपले अधिकृत प्रतिनिधीमार्फत किंवा वकिलामार्फत उपस्थित रहावे ही आपणास अखेरची संधी देणेत येत आहे. तुम्ही अशा रीतीने हजर न राहील्यास अर्जदार श्री. जर्नादन हरी अपंगे, रा. कुटरे यांना कुळ म्हणून घोषित करणेबाबत आपली कोणतीही हरकत नाही असे गृहित धरून सदर दाव्याबाबत कामकाज पुढे चालवून निकाल देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मौजे, कुटरे, ता.चिपळूण येथील खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत जमिनीचा तपशिल

गावाचे नाव	भुधारणा पद्धत	भुमापन क्र.	उपविभाग	क्षेत्र हेआरपॉ	आकार रू.पै.	ठिकाण
कुटरे	भो.वर्ग-१	३९६/४	--	००.२१.२०	०.२१	घरपरडे

सदरची नोटीस माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.
स्थळ :- चिपळूण
दिनां